महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

## अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडल, नागपूर

**प्रकल्पग्रस्तांकरीता जाहिरात क्र. ४/२०१७ अंतर्गत तांत्रिक कर्मचारी श्रेणी-६ (पुर्वीचे पदनाम- तंत्रज्ञ श्रेणी-४) पदावर नेमणूक करण्यासाठी निवड करण्यात आलेल्या उमेदवारांची तात्पुरती निवड यादी / प्रतिक्षा यादी**

------

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित या कंपनीने प्रसारित केलेल्या जाहिरात क्र. ०४/२०१७ अन्वये प्रकल्पग्रस्तांकरीता तांत्रिक कर्मचारी श्रेणी-६ (पुर्वीचे पदनाम- तंत्रज्ञ श्रेणी-४) या पदाच्या दि. १७.०२.२०१८ रोजी घेण्यात आलेल्या ऑनलाईन लेखी परीक्षेत उमेदवारांना प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे तसेच, जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे म.रा.वि.मंडळ / म.रा.वि.पारेषण कंपनी मर्यादित मध्ये वीजतंत्री व्यवसायात शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण पुर्ण केलेल्या व महापारेषण कंपनीसाठी जमीन दिलेल्या कंपनीच्या प्रकल्पग्रस्तांना अतिरिक्त गुण देऊन त्याचप्रमाणे जाहिरातीत नमूद केलेली तांत्रिक कर्मचारी श्रेणी-६ (पुर्वीचे पदनाम तंत्रज्ञ श्रेणी-४) या पदाची संख्या व सामाजिक आरक्षण वगैरे बाबी विचारात घेवून तसेच या पदासाठी झालेल्या ऑनलाइन परिक्षेच्या जाहिर केलेल्या प्रश्न व उत्तर पत्रिकेवर प्राप्त झालेल्या आक्षेपावर योग्य ती कार्यवाही करुन निकाल तयार करण्यात आला आहे. तात्पुरते पात्र ठरलेल्या उमेदवारांची तांत्रिक कर्मचारी श्रेणी-६ (पुर्वीचे पदनाम तंत्रज्ञ श्रेणी-४) या पदाची तात्पुरती निवड / प्रतिक्षा यादी ही खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून तयार करण्यात आलेली आहे.

१. उमेदवारांची निवड ही तात्पुरती असून उमेदवारांनी त्यांच्या ऑनलाईन अर्जामध्ये दर्शविलेल्या इतर माहितीच्या आधारे करण्यात आलेली असून याबाबतची मूळ प्रमाणपत्रांची / कागदपत्रांची तपासणी करण्यात येईल.

२. तात्पुरती निवड करण्यात आलेल्या सर्व उमेदवारांनी त्यांची शैक्षणिक अर्हता, वय, जात, उन्नत-प्रगत गटात मोडत नसणे, प्रकल्पग्रस्त, महापारेषण कंपनीचे प्रकल्पग्रस्त, तसेच म.रा.वि.मंडळ / महापारेषण कंपनीत यशस्वीरित्या वीजतंत्री या व्यवसायातील शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण पूर्ण केले असल्यास त्याबाबतचे सर्व मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे ही पडताळणीच्यावेळी सादर करणे बंधनकारक राहील व ती सादर करु न शकल्यास उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल.

३. तात्पुरत्या निवड यादीत नावाचा समावेश आहे म्हणून नेमणूक मिळण्याबाबतचा कोणताही हक्क उमेदवारांना राहणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. ही निवड यादी पुर्णतः जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता आणि इतर अटी व शर्ती पुर्ण करण्याच्या अधीन राहून तयार करण्यात आली आहे.

४. प्रकल्पग्रस्तांकरीता तांत्रिक कर्मचारी श्रेणी-६ (पुर्वीचे पदनाम- तंत्रज्ञ श्रेणी-४) या पदासाठी आवश्यक असलेली पुर्वावश्यकता धारण करीत नसल्याचे किंवा नेमणुकीसाठी आवश्यक असलेल्या अटींचा किंवा जाहिरातीमधील कोणत्याही अटींचा व शर्तीचा भंग होत असेल तर संबंधित उमेदवारांची निवड कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

५. जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे उमेदवारांजवळ असलेली पात्रता व सर्व आवश्यक कागदपत्रे ही जाहिरातीस अनुसरुन तांत्रिक कर्मचारी श्रेणी-६ (पुर्वीचे पदनाम- तंत्रज्ञ श्रेणी-४) या पदासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करताना जाहिरातीच्या शेवटच्या दिनांकापर्यंत धारण /प्राप्त केलेले असणे व वैध असणे आवश्यक आहे याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. ज्या उमेदवारांनी आवश्यक पात्रता व कागदपत्रे ही जाहिरातीच्या शेवटच्या दिनांकापर्यंत धारण / प्राप्त केलेली नसतील व वैध नसतील अशा उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल व सदर प्रकरणी कोणत्याही पत्र व्यवहाराची दखल महापारेषण कंपनीतर्फे घेण्यात येणार नाही.

६. तांत्रिक कर्मचारी श्रेणी-६ (पुर्वीचे पदनाम- तंत्रज्ञ श्रेणी-४) या पदाच्या तात्पुरत्या निवड यादीतील उमेदवार हे कागदपत्रे पडताळणीत अपात्र आढळून आल्यास प्रतिक्षा यादी कार्यान्वीत करण्यात येऊन त्या यादीतील उमेदवारांची पात्रता व कागदपत्रे पडताळणी करण्याची प्रक्रिया पार पाडण्यात येईल. सदर प्रतिक्षायादीतील उमेदवार सुध्दा पात्रता व कागदपत्रे पडताळणीत अपात्र ठरल्यास त्याखालील गुणवत्ताधारक उमेदवारांची स्वतंत्र निवड / प्रतिक्षा यादी लावण्याचे अधिकार महापारेषण कंपनी राखून ठेवत आहे.

७. तदर्थ म.रा.वि.मंडळ/महापारेषण कंपनीत वीजतंत्री या व्यवसायातील शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या सर्व अर्हता धारण करणा-या उमेदवारांना जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे त्यांनी ऑनलाईन परीक्षेत मिळविलेल्या गुणांच्या १०% अधिक गुण त्यांच्या लेखी परीक्षेतील गुणांमध्ये मिळवून येणा-या गुणांच्या आधारे अंतिम निवड यादी तयार करण्यात आली आहे. त्यासाठी उमेदवाराने अर्ज करण्याच्या अंतिम तारखेपर्यंत धारण केलेले वीजतंत्री या व्यवसायातील शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण पूर्ण केल्याबाबतचे तदर्थ म.रा.वि.मंडळ / महापारेषण कंपनीने जारी केलेले वैध प्रमाणपत्र कागदपत्रे पडताळणीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

८. महापारेषण कंपनीच्या प्रकल्पग्रस्तांना जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे त्यांनी ऑनलाईन परीक्षेत मिळविलेल्या गुणांमध्ये कौशल्य विकास योजने अंतर्गतचे अधिक गुण मिळवून त्या आधारे अंतिम निवड यादी तयार करण्यात आली आहे. त्यासाठी उमेदवाराने संबंधित जिल्हाधिकारी / जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी जारी केलेले प्रमाणपत्र तसेच, जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे संबंधित परिमंडल कार्यालयाने जारी केलेले प्रमाणपत्र व अन्य संबंधीत व आवश्यक ती कागदपत्रे पडताळणीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

९. निवडसूची बनविताना ज्या उमेदवारांचे एकत्रित मिळविलेले गुण समान असतील त्यामधील जो उमेदवार महापारेषण कंपनीसाठी जमीन दिलेला प्रकल्पग्रस्त असेल तर त्यास प्रथम प्राधान्य देण्यात येईल. तसा उमेदवार नसल्यास तदर्थ म.रा.वि.मंडळाचे/ महापारेषण कंपनीकडे वीजतंत्री या व्यवसायात शिकाऊ उमेदवारी पूर्ण केलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात आले आहे. तसेच, तदर्थ म.रा.वि.मंडळ / महापारेषण कंपनी किंवा बाहयस्थ दोन किंवा अधिक उमेदवारांचे एकूण गुण समान असलेल्या उमेदवारांची जन्मतारीख विचारात घेऊन त्यांच्यातील जेष्ठताक्रम (वयाने जेष्ठ असणा-यास प्राधान्य) ठरविण्यात आला आहे.

१०. तांत्रिक कर्मचारी श्रेणी-६ (पुर्वीचे पदनाम- तंत्रज्ञ श्रेणी-४) या पदाची तात्पुरती निवड / प्रतिक्षा यादी घोषित करताना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आलेली आहे. तथापि, अनावधनाने किंवा मुद्रण दोषामुळे झालेल्या चुका सुधारीत करुन योग्य ती कार्यवाही करण्याचा अधिकार महापारेषण कंपनीने राखून ठेवलेला आहे.

११. तांत्रिक कर्मचारी श्रेणी-६ (पुर्वीचे पदनाम- तंत्रज्ञ श्रेणी-४) या पदाची तात्पुरती निवड / प्रतिक्षा सूची ही निकाल घोषित केल्याच्या तारखे पासून १ वर्षा करीता वैध राहील.

१२. अयशस्वी उमेदवारांनी व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांनी कोणत्याही प्रकारचे पत्रव्यवहार महापारेषण कंपनीकडे करु नये. उमेदवारांच्या कोणत्याही पत्रव्यवहाराची महापारेषण कंपनीकडून दखल घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१३. तांत्रिक कर्मचारी श्रेणी-६ (पुर्वीचे पदनाम- तंत्रज्ञ श्रेणी-४) या पदाच्या तात्पुरत्या निवड / प्रतिक्षा यादीत समावेश असलेल्या उमेदवारांच्या प्रमाणपत्रे / कागदपत्रे पडताळणीच्या पुढील प्रक्रिये संदर्भात महापारेषण कंपनीच्या www.mahatransco.in या संकेतस्थळावर सूचनापत्र देण्यात येईल. त्यासाठी या उमेदवारांनी सदर संकेतस्थळावर जावून सूचनापत्र पहावे व त्याप्रमाणे कागदपत्रे पडताळणीसाठी सूचनापत्रात नमूद केलेल्या कार्यालयात हजर रहावे.

१४. तांत्रिक कर्मचारी श्रेणी-६(पुर्वीचे पदनाम-तंत्रज्ञ श्रेणी-४)या पदाची तात्पुरत्या निवड/प्रतिक्षा यादी खालीलप्रमाणे :-

| Sr No. | Roll No | Candidate Name | Category |
|---|---|---|---|
| **SELECT LIST** | | | |
| 1 | 1410601039 | NILESH PRABHAKAR BHUJADE | OPEN |
| 2 | 1410500855 | ANIL KEWALRAM TULASKAR | OPEN |
| **WAIT LIST** | | | |
| 1 | 1410500818 | PRAVIN NILKANTHRAO BELKHODE | OPEN |

❖ **उमेदवारांनी ऑनलाईन परीक्षेत प्राप्त केलेले गुण पाहण्यासाठी येथे क्लिक करावे.**

**सही/-**
**मुख्य अभियंता**
**अउदा प्रकल्प तथा संवसु परिमंडल, नागपूर**

**दिनांक:- ०७.०४.२०१८**

**********